PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# आदिवासी वीरपुरुष

**प्रा. संदीप भागु चपटे**

**सहाय्यक प्राध्यापक**

**शांतारामभाऊ घोलप आर्टस् , सायन्स**
**अँड गोतिरामभाऊ पवार कॉमर्स कॉलेज**
**शिवळे, ठाणे. महाराष्ट्र भारत**

## प्रास्ताविक:

संशोधकाने निवडक आदिवासी शौर्यतेजांचा जीवनसंघर्षाचा, धार्मिक,सांस्कृतिक औदार्याचा, कार्याचा आणि जीवनदृष्टिचा परिचयात्मक आढावा घेतला आहे. त्यामध्ये महात्मा रावण, महात्मा एकलव्य,नरवीर उमाजी नाईक, वीर भागोजी नाईक, वीर तंट्या भिल्ल, वीर गुलब्या नाईक, भगवान बिरसा मुंडा, वीर दादासाहेब सौदाणे, वीर खाजा नाईक, वीर पी.जी. भांगरे, वीर दगडू पाटील गोडे इत्यादी आदिवासी शौर्यतेजांच्या कार्याचा आढावा संशोधकाने घेतला आहे. आपल्या निधड्या छातीवर वार झेलून या देशाचे 'देशपण' शाबूत ठेवणारे झुंजार रणवीर आदिवासींनी या देशाला दिले. अनेक शूर तेजस्वी राष्ट्रभक्त, शहीद हुतात्मे राजे महाराजे आदिवासी समाजात होऊन गेले. आज तर महापुरुषांच्या, संतांच्या, वीरांच्या जयंत्या–पुण्यतिथ्या भारतीय समाज मोठ्या अभिमानाने आनंदाने साजरा करत असतो. पण आदिवासी समाजाला आता हळूहळू आपले महात्मे, वीरपुरुष समजायला लागले आहेत. त्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्याही ते आज आनंदाने साजरे करताना दिसून येत आहेत. पण हे प्रमाण फार कमी आहे. जो गुण इतरांमध्ये नाही तो आदिवासी समाजाकडे आहे. पण त्यांच्या या गुणाचा उपयोग करुन बऱ्याच समाजाने आपल्या नेत्यांच्या, महापरुषांच्या जयंत्या पुण्यतिथ्यांना प्रेक्षक म्हणून आदिवासी गोळा करुन आणण्याचा व शोभा वाढविण्याचा घाट घातला आहे. आता आदिवासी समाजानेही आपल्या महात्यांच्या, वीरपुरुषांच्या व राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या–पुण्यातिथ्या आपल्या वस्त्यांमध्ये साजऱ्या करणे गरजेचे आहे. यासाठी प्रथम आपले शूरवीर, महात्मे व वीरपुरुष यांची माहीती होणे गरजेचे आहे.

**महात्मा रावण:**

आदिवासींचा पहिला महापुरुष म्हणजे महात्मा रावण होय. लंकेचा अधिपती रावण हा खऱ्या अर्थाने आदिवासी महात्मा आहे. पिता विश्रवा व माता कैकसी यांचा ज्येष्ठ पुत्र रावण एक उत्तम सैन्यसंचालक व त्रैलोक्य विजयी होता. तसाच तो बौद्ध उपासक, वैद्य नीतिनियामक, समाजसुधारक, महान तांत्रिक व कर्मकांडतज्ज्ञ होता. भगवान शंकराचा अनन्यभक्त व आत्मविश्वासी होता. रावण लहानपणापासूनच प्रतिभावंत होता. त्यामुळे विद्या ग्रहण करण्याची श्क्ती त्याच्यात त्याच्या बंधुपेक्षा जास्त होती. तसेच रावण धनुष्यबाण, मुष्टीयुद्ध, तोमर यामध्ये पूर्णपणे पारंगत होता. रावणाने आपली युवासेना स्थापन करुन चारी दिशांवर विजय मिळविण्याची मोहीम काढली. या कार्यात त्याला त्याचे आजोबा व

मामा यांनी सल्लागार म्हणून योग्य भूमिका बजावली होती. रावणाची युवासेना उत्तर पश्चिमी सर्व द्विपसमूहांवर जय मिळवित व स्वर्णपुरी लंकेच्या दिशेने पुढे आली. तिने अंगद्विप (सुमात्रा), जयद्विप (जावा), मलद्विप (मलाया), शंखद्विप (बोर्निओ), कुशद्विप (आफ्रिका), वराद्विप (मादागास्कर) इत्यादी भागांवर विजय मिळविला होता आणि सरते शेवटी चारी बाजूने पाण्याने वेढलेल्या लंकापुरी येथे आले. यावेळेस लोकपाल धनेश वैश्रवण कुबेर यक्षराज हा लंकेचा अधिपती होता. रावणाने लंकेच्या जवळ मुक्काम केला. रावणाचे आजोबा सुमाली एक कुटनीतीतज्ज्ञ होते. पुढे रावणाने लंका ही आपली भूमी आहे, ती आपल्याला, राक्षसांना करावी असा दूताकरवी कुबेरास निरोप पाठवला. कुबेराने विश्रवांसी सल्लामसलत करुन लंका रावणाच्या ताब्यात दिली व रावण लंकापती झाला. यानंतर त्याने आपला मोर्चा भारताकडे वळवला. पहिल्याच मोहिमेत मरुत (वायुदेव), सुरध, दुष्यंत, गाधी आणि पुरुखा या राजांनी त्याच्यापुढे शरणागती पत्करली.

परंतु वैदिकांच्या विरोधात असणाऱ्या रावणाला वैदिकांनी इतके विद्रुप करण्याचे काम केले की, रावणाला पिढ्यानपिढ्या खलनायकाच्या रुपात समाजासमोर उभे केले. हे केवळ दुराचारी वैदिक रामाला श्रेष्ठत्वाला पोहचवण्यासाठी. रावण खरंच दहा तोंडाचा होता का? या प्रश्नाचे उत्तर तपासताना सद्सद विवेकबुद्धीनुसार तसे वाटत नाही. रावण जर दहा तोंडाचा होता तर त्याच्या पोटी जन्मलेले एकही अपत्य तसे का झाले नाही? तसेच रामायणा अगोदर वेदकाळातही अशी व्यक्ती जन्मलेली दिसत नाही. मग रामायणच अपवाद कसे होते? एक गोष्ट मात्र मान्य करावी लागेल की, रावण इतका प्रतिभावंत व बुद्धिमान होता की, तो एकाच वेळेस दहा व्यक्तींशी दहा विषयांवर बोलत असे व दहा व्यक्तींशी एकाच वेळेस वादविवादही करु शकत असे. म्हणजे रावण दहा वैदिक ब्राह्मणांना भारी होता. श्रेष्ठ होता. यामुळेच रावणाला वैदिकांनी दहा तोंडाचा बनविला असेल, असे मानण्यास वाव मिळतो.

रावणाने आयुष्यभर आपल्या वंशाची म्हणजे आदिवासींची काळजी घेतली. रावण आपले आयुष्य आपल्या समाजासाठी जगला यातच त्याचे महात्म्य दडलेले आहे. रावणाची लंका सोन्याची होती पण तो विलासी जीवन जगला नाही. त्याने संपत्तीचा कधी गर्व केला नाही. एक त्यागी जीवन जगणारा रावण महात्मा नाही तर दुसरा कोण होऊ शकतो? त्या सीतेला त्याने पळवून आणले त्या सीतेचे शील तो वाटेतच लुटू शकत होता. त्यावेळी त्याला प्रतिकार करण्याची हिंमत ना सीतेत होती ना दुसऱ्या कोणात. एवढेच नाही तर सहा महिने स्वत:च्या ताब्यात असणाऱ्या सीतेचे त्याने शील भ्रष्ट केले नाही. तिला महालात न नेता अशोक वनातच ठेवले. पण श्रेष्ठ समजणारा राम स्वत:च्या पत्नीला लक्ष्मण, बिभीषण, शत्रुघ्न यांच्याकडे जायला सांगतो तो राम महात्मा कधीच होऊ शकत नाही. म्हणून रावण रामापेक्षा नेहमीच श्रेष्ठ होता. त्याच्या या श्रेष्ठत्वामुळे राम स्वर्गाला गेला पण रावण समजून घेण्यासाठी स्वत:ची बुद्धी व संस्कृती लागते.

**महात्मा एकलव्य:**

महाभारतातील एकलव्याची कथा सुरुवातीलाच आली असून ती आदिवासी समाजाच्या दु:ख व वेदनेवर चांगले मीठ चोळते. ब्राह्मणांनी आपल्या स्वार्थासाठी व वैदिक धर्मप्रसारासाठी विद्याबंदी घातल्याचा पुरावा महाभारतात मिळतो. तसेच ही विद्याबंदी फक्त शूद्र आणि अतिशूद्रानांच होती असे नाही तर ती आदिवासींनाही लागू होती

एकलव्य महाभारतात फार कमी प्रमाणात आलेला आहे. महाभारतातील इतर पात्रांप्रमाणेच तो शेवटपर्यंत दिसत नाही. यामुळे ही कथा ब्राह्मणांनी महाभारतात नंतर घुसवली की काय, अशीही शंका येते. कारण द्रोणाचार्याकडे विद्या मागण्यासाठी आलेला एकलव्य कथेच्या शेवटी द्रोणाचार्यांना अंगठ्याची गुरूदक्षिणा देतो, एवढीच त्याची महाभारतातील भूमिका. पण या कथेचा परत दुसऱ्या कोणत्या ठिकाणी साधा संदर्भही येताना दिसत नाही. मग प्रश्न निर्माण होतो, या

कथेला महाभारतात आणण्या पाठीमागचे प्रयोजन काय? किंवा एकलव्य नावाच्या पात्राला महाभारतात स्थान का दिले? या दोन्ही प्रश्नांचे उत्तर एकच, आदिवासींना ब्राह्मणांनी केलेली विद्याबंदी होय.

आदिवासी भिल्ल असणारा एकलव्य द्रोणाचार्यांकडे धनुर्विद्या शिकण्यासाठी गेलाच कशाला? एकलव्याचे वडील धनुर्विद्येत पारंगत होते. त्याने त्यांच्याकडून विद्या ग्रहण केली नाही. द्रोणाचार्याने नकार दिल्यावर त्याने आपल्या वडीलांकडे धनुर्विद्येची मागणी का केली नाही? उलट तो मातीचा द्रोणाचार्यांचा पुतळा करून स्वत: विद्या ग्रहण करतो.

हे सर्व खरे असले तरी या कथेतून बऱ्याच गोष्टी शिकता येतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे आदिवासींकडे ज्या काही कला उपजत आहेत त्यातली प्रमुख कला म्हणजे नेमबाजी. आजही गलोर चालवणारी मुले कोणाला गुरू मानत नाहीत तर स्वत:च हे नेमबाजीचे शिक्षण आत्मसात करतात. आज आदिवासींमध्ये या कलेतील जिद्द, चिकाटी दिसून येते. हेच गुण एकलव्यामध्ये दिसतात. द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा या कथेत गौण आहे. पुतळा करून हातावर हात ठेऊन एकलव्य गप्प बसला असता तर अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धर कधीच बनला नसता. पण त्याची जिद्द, इच्छाशक्ती प्रबळ असल्याने त्याने सतत सराव केला. ज्यामुळे तो अर्जुनालाही श्रेष्ठ ठरला. एकलव्य जर त्या वयात अर्जुनापेक्षा श्रेष्ठ नसता तर द्रोणाचार्याने त्याच्या हाताचा अंगठा मागितलाच नसता, हे आपण प्रथम लक्षात घेतले पाहिजे.

याच कथेची दुसरी बाजू ही की, आदिवासींना आपल्या माणसाचे श्रेष्ठत्व समजले नाही. त्यांनी नेहमीच दुसऱ्याला श्रेष्ठ मानले. स्वत:चे वडील धनुर्विद्येत पारंगत असताना एकलव्य द्रोणाचार्यांकडे गेला. म्हणजेच घरचा गुरू सोडून दारचा गुरू करण्याचा मनोदय झाला. येथेच एकलव्य चुकला. ज्याला गुरू बनवायला गेला त्याने आपले गुरूपण निभावले नाहीच पण उलट कपटीपणाने त्याचा अंगठा गुरूदक्षिणा म्हणून मागितला. भावनेच्या भरात अंगठा कापून दिला. कपटी द्रोणाचार्याने तो स्वीकारून एका आदिवासी मुलाचा जणू प्राणच घेतला. हे सर्व झाले ते केवळ एकलव्य त्याच्या वडिलांना ओळखू न शकल्यामुळे.

तर यातली तिसरी गोष्ट म्हणजे, या कथेतून ब्राह्मणांना पुढील पिढीला हेही सांगावयाचे असेल की ब्राह्मणांशिवाय धनुर्विद्या कोणाला घेता येणार नाही. द्रोणाचार्यांचा मातीचा का होईना एकलव्याने पुतळा केला म्हणून एकलव्य धनुर्विद्या घेऊ शकला. अन्यथा त्याला ते जमणे अशक्य होते. म्हणजेच मातीच्या पुतळ्यात प्राण नसला, तो निर्जीव असला, तरी तो एका ब्राह्मणाचा पुतळा होता म्हणून एकलव्य श्रेष्ठ ठरला. असेही या कथेतून ब्राह्मणांना दाखवायचे असेल व आपला वर्ग किती श्रेष्ठ आहे हे भारतीय आदिवासींच्या मनावर ठसावयाचे असेल. म्हणून या कथेचा जन्म झालेला असावा व ती महाभारतात नंतर घुसवली गेली असावी.एकलव्याने स्वत:च्या हिमतीवर धनुर्विद्या ग्रहण केली व द्रोणाचार्यांच्या धनुर्विद्येलाच आव्हान दिले. हा बाणेदारपणा एकलव्याने दाखवला म्हणून एकलव्य महात्मा ठरतो. महाभारतात आलेला तो पहिला आदिवासी पुरुष होय.

**भगवान बिरसा मुंडा**:

ॲड. साळवे हे भगवान बिरसा मुंडा यांच्या बद्दल म्हणतात,"तुझ्या नेतृत्वाखाली आदिम जगताने एक महान मुक्तीसंग्राम सुरू केलेला होता. हजारो वर्षांपासून अन्याय अत्याचार व आक्रमक शोषकांविरुद्धचे लोकयुद्ध तू उजागर केलेस." बिहार राज्यातील बिरसामुंडा याचे कार्य इतर आदिवासी वीरांपेक्षा फार आगळे वेगळे होते. बिरसा मुंडा यांने कायदेभंगाची सशस्त्र चळवळ उभारून आदिवासी समाज शोषणमुक्त करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. राजनैतिक आंदोलन चालवून आदिवासींचे परंपरागत अधिकार व संस्कृतीवरील आक्रमण याविरुद्ध त्याने संघर्ष पुकारला. १८५८ मध्ये शेतसारा

न भरण्याचे व कायदेभंगाचे आवाहन केले. याबद्दल त्यांना २० वर्षांची शिक्षा झाली. १८९७ मध्ये त्यांना सोडावे लागले. १८९९ मध्ये त्यांनी सशस्त्र संघर्ष केला. यामुळे ३ फेब्रुवारी १९०० ला त्यांना पुन्हा अटक झाली. यातच ९ जून १९०० मध्ये बिरसा मुंडा यांचा अंत झाला. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना आदिवासी समाजातील डॉ. आंबेडकर म्हणतात.

**वीर तंट्या भिल्ल:**

आदिवासी पराक्रमाच्या इतिहासातील एक वादळी व्यक्तिमत्व म्हणजे तंट्या भिल्ल होय. तंट्या जातीव्यवस्थेचा गुन्हेगार होता. पण माणुसधर्माचा तो एक आदर्श पुरूष होता. मध्य प्रांतातील निमाड जिल्ह्यातील एका सामान्य खेड्यात १८४२ साली तंट्याचा जन्म झाला. त्याच्या वडिलांचे नाव भाऊसिंग. लहान वयातच आईचे ममत्व हरपले. तंट्या लहानपणातच भाला फेकणे, धनुष्यबाण चालवणे या गोष्टी शिकत होता. तंट्या निम्म्या वयापर्यंत शेती करत होता. पण सरंजामशाहीने त्याचे शेत बळकावण्याचा प्रयत्न केल्यावर तंट्या चिडला व सरंजामशाही मोडीत काढण्यावरच त्याने प्रथम भर दिला. प्रथम लढा त्याने 'शिवा पटेल' या सरंजामाविरुद्ध दिला. पण शिवा पटेलने त्याच्या या कृत्याला गुन्हेगार ठरवून पोलिसांच्या ताब्यात दिले. यात त्याला एक वर्षाचा सश्रम कारावास झाला. हा भोगून परत आल्यावर तंट्याने शिवा पटेलच्या मुलीसंगे लफडे असल्याची अफवा उठविण्यात आली. यामुळे त्याने गाव सोडणे पसंत केले. यानंतर त्याला खोट्या चोरीच्या गुन्ह्यात तीन महिने सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागली. शिक्षा भोगून झाल्यावर ब्रिटिश राजवटीच्या हद्दीत रहायचे नाही, असे त्याने मनोमन ठरविले व त्याने सिओरा या गावी आश्रय घेतला. पण शिवा पटेलने येथेही तंट्याचा पाठलाग केला. यावेळेस सुवान भिल्लाच्या घरातल्या काही वस्तू चोरीस गेल्या होत्या व त्या जेलीम नावाच्या माणसाने चोरल्या होत्या, हे खरे असताना शिवा पटेलने जलीमला वाचवले. राजपुतांची साथ घेऊन या चोरीत तंट्याला अडकविले. पण पोलिसांच्या हाती सापडण्याअगोदरच तंट्याने जंगलाचा आश्रय घेतला. जंगलात टोळी तयार करून सरंजामशाहीविरुद्ध शह देण्यास सुरुवात केली. पण त्याला नशिबाने साथ दिली नाही. सरदार पटेल, मोहन या सारख्या गावगुंडांनी विश्वासघाताने तंट्याला परत पोलिसांच्या ताब्यात पकडून दिले. २९ नोव्हेंबर १८७८ रोजी खटला उभा राहिला. तंट्या व त्याच्या साथीदारांना दोषी ठरविण्यात आले, पण निकाल एक दिवस राखून ठेवला. यामुळे तंट्या व त्याच्या साथीदारांना परत तुरुंगात ठेवले. पण या एक दिवसाचा फायदा घेऊन तंट्याने तुरुंगातून पलायन केले. जंगलात गेल्यावर त्याने तुरुंगाचे बिल्ले फेकून दिले. दौल्या नावाच्या त्याच्या साथीदाराला शेजारच्या गावात पाठवून दुकानदाराकडून कपडे आणण्यास सांगितले. दौल्याने तंट्याला कपडे लागतात असे दुकानदाराला सांगताच दुकानदाने पैसे न घेता कपडे दिले. तसेच सर्वांना पुरेल इतके मटन व दारूही सोबत तो देण्यास विसरला नाही.

तंट्या आपल्या जातीच्या लोकांना कधीच कोणता त्रास देत नसे. उलट त्यांच्या अडीअडचणी भागवण्यात स्वत:ला धन्य मानायचा. यामुळे भिल्ल समाज तंट्याला फार मान देत असे. याच काळात त्याने आपल्या विरोधकांचा काटा काढला. शिवा पटेल, सरदार पटेल यांची घरे जाळली वर आपल्याविरुद्ध खोटी साक्ष देणाऱ्या हिंमत पटेलला गोळी घालून ठार केले. यामुळे इंग्रज पोलिस तंट्याच्या मागे हात धुऊनच लागले. पोलिस आपल्या मागावर आहेत म्हणून त्यांना प्रतिशह देण्यासाठी तंट्यानं आपल्या साथीदारांसह एका वर्षात चोवीस दरोडे घातले तर कित्येकांना लुटले.

तंट्याला पकडण्यासाठी खास डिटेक्टिव्ह विभागाच्या 'इब्राहिम बेग' नावाच्या इन्स्पेक्टरची नेमणूक करण्यात आली. सर्व प्रयत्न करुन सुद्धा तंट्या सापडत नाही हे लक्षात येताच ब्रिटिश सरकारने तंट्याला पकडण्यासाठी मदत करावी अशी विनंती होळकर महाराजांना करण्यात आली. पण होळकरांनाही शेवटी तोच अनुभव आला. एक दिवस तंट्याने अंबा मालगुजाराच्या घरी दरोडा घातला. दरोडेखोरी थांबवण्यासाठी अंबा येथे एका कॉन्स्टेबलची नेमणूक करण्यात आली होती.

त्याचा मुक्काम मालगुजाराच्या घरी होता. दरोडा घालण्यापूर्वी तंट्याने कॉन्स्टेबलला गुजराचे घर सोडून जाण्यास सांगितले होते. पण तो गेला नाही. उलट तंट्याची बंदूक हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. मग मात्र तंट्याने त्यालाच पकडून बांधून ठेवले. त्याची बंदूक हिसकावून घेतली. संपूर्ण घरे लुटली व जाताना कॉन्स्टेबलला परत सोडून दिले.

अशा प्रकारे तंट्या लुटालुट जाळपोळ नित्य नियमाने करतच होता. तर पोलिस सारखे इकडून तिकडे धावत आपली दमछाक करुन घेत होते. बेरीसराय, गोटी, इचीलपूर, मेळघाट, हेमगिरी, तिनसीया, मुलगाव, बारूर या सारख्या गावात दरोडे घालून पोलिसांना त्याने चक्रावून सोडले होते. पण या सर्व धावपळीत, लुटालुटीत तंट्या आता शरीराने थकला होता. भरधाव वेगात धावणाऱ्या रेल्वेगाडीत तो प्रवेश करत असे व ताकद लावून दरवाजा तोडीत असे. एका दमात साठ मैल न थांबता चालणारा तंट्या आता वीस मैलही चालू शकत नव्हता. पहिल्यासारखे आता त्याला दिसतही नव्हते. यामुळे त्याने आता इंग्रज सरकारची माफी मिळवायची म्हणून 'गणपत राजपुत' यांच्याशी संधान साधून सरकारजवळ माफीविषयी बोलण्यास सांगितले. पण गणपत बोलला तर नाहीच उलट आपण बोललो आहे व माफीचे पत्र मिळणार आहे असे खोटे सांगितले. एवढेच नाही तर पोलिसांना खबर करून तंट्याला एक दिवस घरी बोलावले. त्याचे आदरातिथ्य केले. संगती आलेल्या साथीदारांना मोठ्या हुशारीने परत जाण्यास सांगितले. तसेच तंट्याजवळील बंदुक हासत काढून घेऊन बाजुला ठेवली व मग दबा धरून बसलेल्या पोलिसांना खूण करून बोलावले आणि अलगद तंट्याला पकडून दिले.

तंट्याला पकडल्यावर त्याच्यावर खटला चालला. त्यात त्याला प्रथम दरोडा घालणे आणि कत्तल करणे या गुन्ह्यांखाली ७ ऑक्टोंबर १८८९ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यानंतर त्याला फाशी देण्यात आली.

**महापुरुष आद्यक्रांतीकारक नरवीर उमाजी नाईक:**

भारतीय स्वातंत्र्य इतिहासातील आणखी एक सोनेरी नाव म्हणजे उमाजी नाईक होय. उमाजी नाईक इतका जबरी हादरा इंग्रज सरकारला दुसरा कोणी दिला नाही. इंग्रज सरकारला शह देणाऱ्या या आदिवासी वीराला पकडण्यासाठी फक्त इंग्रजच टपलेले नव्हते तर इंग्रज सरकारचे गुलाम बनलेले भारतीय पंत, सचिव, निंबाळकर, पटवर्धन, जहागीरदार, सावकार, पाटील, पुरंदर किल्ल्यावरचे शिबंदी, सासवडचे शिबंदी हे स्वकीयच होते. उमाजीस पकडण्यासाठी इंग्रज सरकारने खास 'पुना हॉर्स' या घोडदळाची स्थापना केली होती. किकवी, जेजुरी, परिंचा येथे खास पोलिस चौक्या उभारण्यात आल्या होत्या. एवढेच नाही तर लेफ्टनंट कारथ्युज, कॅप्टन मॅन्सफील्ड, मक्कम साहेब, रॉबर्टन साहेब, कॅप्टन ल्युकन, कॅप्टन किंगस्टन, लेफ्टनंट अंडरसन, लेफ्टनंट लॉग, लेफ्टनंट लाफईड, जिब्रान साहेब, कॅप्टन मॅकिटॉश, कॅप्टन लिव्हिंगस्टोन, लेफ्टनंट हार्टले, लेफ्टनंट क्लार्क, कॅप्टन बॉईड, लेफ्टनंट फुलरटन, लेफ्टनंट फॉरबस, लेफ्टनंट शॉ, लेफ्टनंट ख्रिस्तोफर, स्लिपर डेव्हीस हे सर्व इंग्रज अधिकारी रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून उमाजीस पकडण्याचा प्रयत्न करत होते.

उमाजी नाईक यांना पकडण्यासाठी पहिला जाहीरनामा रॉबर्टसन साहेबांनी काढला तो असा होता– ह्या, तमाम, रयतेस कळविण्यात येते की, उमाजी व पांडूजी ह्या दोघांना धरून देणारास दर आसामीवर हुकूम शंभर रुपये बक्षिस मिळेल. तसेच त्यांच्याविषयी उपयुक्त माहिती पुरविणारास ती माहिती योग्य असल्यास पडताळून पाहून योग्य ते बक्षिस मिळेल. तसेच उमाजींच्या बंडात सामील असलेला कोणताही माणूस धरून दिल्यास त्यास दर इसमामागे पन्नास रुपये बक्षिस मिळेल.

उमाजी नाईक यांच्या या जाहीरनाम्याप्रमाणे जर भारतीय जनतेने त्यांना साथ दिली असती तर स्वातंत्र्यासाठी १९४७ हे साल पाहावे लागले नसते. राजे उमाजी नाईकांचे स्वप्न व त्यांचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराज होते. त्यांना

त्यांच्यासारखेच स्वत:चे राज्य स्थापन करून इंग्रज सरकारला या देशातून कायमचे घालवायचे होते पण या आदिवासी वीराला साथ देतील ते भारतीय कसले? जातीयतेने सडलेल्या भारतीयांना बंधुभाव कधी समजेल? उमाजी नाईकाच्या जाहीरनाम्या विरुद्ध वर्तन करून त्यांचे श्रेष्ठत्व कायमचे संपुष्टात आणण्यासाठी 'त्रिंबक चंद्रस' या ब्राह्मणाने आपल्या वैदिक कुटनीतीचा उपयोग करून व या कटाचे काळू आणि नाना आदिवासी या व्यक्तींना सामील करून घेतले. या कटात सूत्र स्वत:च्या हाती ठेऊन त्रिंबक चंद्रस या ब्राह्मणाने काळू व नाना यांच्या साहाय्याने उमाजी नाईकांना पकडून इंग्रजांच्या ताब्यात दिले. भारतभूमीचा भूमिपुत्र इंग्रजांच्या ताब्यात देऊन भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नुकसान तर केलेच पण त्याचबरोबर भारतीय इंग्रज सत्तेचा वाढदिवस साजरा केला. शनिवारवाड्यावरचे हिंदूंचे प्रतिक असणारा भगवा झेंडा ज्याप्रमाणे 'बाळाजीपंत नातू' या ब्राह्मणाने स्वत:च्या हाताने केवळ जेवणासाठी काढून तिथे इंग्रजांचा 'युनियन जॅक' चढवला त्या वैदिक ब्राह्मणांनी उमाजी नाईक या भूमिपुत्रांचे महत्व काय कळणार? छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्या ब्राह्मणांनी 'शूद्र' म्हणून घोर अवमान केला, त्या त्रिंबक चंद्रस नावाच्या ब्राह्मणाला उमाजी नाईक या आदिवासी वीराचे देशासाठी असणारे महत्व काय समजणार?

पकडून दिलेल्या उमाजी नाईकांना इंग्रजांनी सरतेशेवटी ३ फेब्रुवारी १८३२ रोजी फाशी दिली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी पहिला आदिवासी वीर कामास आला. पण ब्राह्मणांनी उमाजींच्या मृत्यूनंतरही उमाजींना न्याय दिला नाही. उमाजी नाईकाच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्य युद्धात उडी घेणाऱ्या व देशासाठी बलिदान देणाऱ्या 'वासुदेव बळवंत फडके' या ब्राह्मण वीराला आद्यक्रांतीकारक म्हणून घोषित केले. पण इतिहास कधी खोटं बोलत नाही. इतिहास लिहिणारे खोटे बोलतात. उमाजी नाईकांच्या नंतर देशासाठी कामी आलेला वासुदेव फडके आद्यक्रांतीकारक कसा होऊ शकेल? आद्यक्रांतीकारक म्हणून उमाजी नाईक यांनाच घोषित करावे लागले व वासुदेव फडकेंना त्यांची जागा दाखवावी लागली. ब्राह्मणांनी उमाजी नाईकांवर, अन्याय हा संपुर्ण आदिवासींवरही केलेला अन्याय होता.

**वीर भागोजी नाईक:**

भागोजी नाईक यांचा जन्म भिल्ल कुटुंबात १८०४ साली झाला. त्यांचे वडील नांदूरशिंगोटे (ता. सिन्नर, जि. नाशिक) येथे कोतवाल होते. त्यांच्या आईचे नाव गिरजाबाई. घरच्या गरिबीमुळे लहानपणीच शिक्षणाला मुकलेला भागोजी गावची गुरे व शेळ्या वळण्याचे काम करत होता. या जनावरांमागच्या भटकंतीतच त्याने नेमबाजीचे स्वप्रयत्नावर शिक्षण घेतले. गलोल चालविणे, काठी फिरवणे, तिरकमान चालवणे या कला त्याने आत्मसात केल्या. एकदा तर जंगलात वाघाने गाईच्या वासरावर हल्ला केल्याचे पाहून हातातील कुऱ्हाडीच्या साहाय्याने त्याने वाघावर प्रतिहल्ला केला. या युद्धात त्याने वाघाला ठार मारले. भागोजी नाईकांच्या पराक्रमाची ती पहिली शिकार होती. त्याचा पराक्रम व बाणेदार वृत्ती पाहून त्याला इंग्रज सत्तेने नगरच्या पोलिस दलात घेतले. पण लहानपणापासून स्वातंत्र्य उपभोगलेल्या भागोजीला गुलामी कशी आवडणार? ते नोकरीवर असतानाच त्यांच्या वरिष्ठांशी त्यांचे भांडण झाले. यामुळे त्यांची नोकरी गेली व पिंजऱ्यात कोंडले. हा राग त्यांच्या डोक्यात कायमच राहिला. यातूनच त्यांनी इंग्रज सत्तेला या देशातून घालवण्याचा विडा उचलला व स्वत:ची टोळी तयार करून ते इंग्रज सत्तेच्या विरोधात उतरले.

भागोजी नाईकांची लढा देण्याची पद्धत इतकी वेगळी होती की, जगावर राज्य करणाऱ्या इंग्रज सत्तेला त्यांचा मागमूस सापडत नसे. भागोजी नाईकाचा बंदोबस्त करणे इंग्रज सत्तेला गरजेचे होते. तो काळ १८५७ च्या स्वातंत्र्य उठावाचा असल्याने अशा क्रांतीकारकांवर इंग्रज सत्तेची करडी नजर होती. ऑक्टोबर १८५७ मध्ये 'लेफ्टनंट हेन्री' भागोजी नाईकांवर चालून आला. त्याअगोदर संगमनेरच्या मामलेदारामार्फत भागोजीला शरण येण्याचा निरोप पाठविण्यात आला

होता. पण भागोजीने ही शरणागती साफ धुडकावून लावली. त्याने मामलेदारास निरोप पाठवून नोकरीतील दोन वर्षाचा पगार व खर्चाच्या रकमेची मागणी केली. यामुळे लेफ्टनंट हेन्री खवळला. त्याला आपला अपमान झाल्यासारखे वाटले. त्याने भागोजीवर चाल करायचे ठरविले. भागोजीचे ठिकाण हेरून त्याने भागोजीवर शिपायांसह चाल केली. भागोजीने बंदुकीला बंदुकीनेच उत्तर दिले. नांदूर शिंगोटे जवळच्या डोंगराशेजारी जोरदार धुमश्चक्री झाली. भागोजीचा नेम अचूक होता. त्याने आपल्या बंदुकीच्या गोळीने लेफ्टनंट हेन्री व त्याचा अंगरक्षक अचूक टिपला. भागोजीला मारायला आलेल्या हेन्रीलाच भागोजीच्या हातच्या गोळीने आस्मान पाहावे लागले. जग सोडून गेलेल्या हेन्रीचे शरीर पाहून थॅकर अधिकच खवळला. त्याने बेछुट गोळीबार करण्याचे आदेश शिपायांना दिले. या जोरदार माऱ्याने भागोजीने माघार घेणे पसंत केले व जंगलाचा आसरा घेऊन टोळीसह पलायन केले. मात्र आपल्या हातून लेफ्टनंट हेन्री मारून नांदुर शिंगोटे येथे त्याचे स्मारक बांधण्यात भागोजी यशस्वी झाला. हा त्याने मारलेला पहिला इंग्रज अधिकारी होता की ज्याला त्याने नांदुर शिंगोटेत मारून भारतभूमीत कायमचे दफन करून ठेवले.

१८५७ साली स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात भागोजी नाईक व त्यांच्या सवंगड्यांनी ठिकठिकाणी उठाव करून इंग्रज सत्तेला चांगलाच घाम फोडला. जंगलांची खडान्खडा माहीत असल्याने भागोजी नाईक इंग्रजांच्या ताब्यात सापडणे अशक्य होते. १८ फेब्रुवारी १८५८ रोजी येवला येथील किल्यात भागोजी नाईकांच्या टोळीवर मेजर पॉटिजर व कॅप्टन नट्टल यांनी अचानक हल्ला केला. याही धुमश्चक्रीत भागोजीने इंग्रजांच्या ४० सैनिकांना ठार करून मोठ्या हिंमतीने आपली सुटका करून घेतली. त्यानंतर भागोजीने मात्र आपली टोळी वाढविण्याचे काम केले. ठिकठिकाणच्या भिल्ल युवकांना एकत्रित करून आदिवासी पलटण तयार केली. या पलटणीचे नेतृत्व हरजी नाईक याचेकडे देऊन त्याला ब्रिटिश छावण्यांवर हल्ले करण्याचे काम सोपविले. एवढेच नाहीवर स्वत:च्या पलटणीत स्वत:चा मुलगा 'यशवंत नाईक' यासही सामील करून घेतले.

१८५९ मध्ये नाशिक मध्ये नवीनच सुपरिडेंट म्हणून आलेल्या 'साऊटरने' भागोजीने करडी नजर ठेवली. खास भागोजीच्या बंदोबस्तासाठीच साऊटरला पाचारण करण्यात आले होते. भागोजीचेही आता वय होत आलेले होते, पण जिद्द तिच होती. रोजची होणारी धावपळ, चकमक, उठाव यासाठी एखादे विश्वासू ठिकाण शोधणे भागोजींना गरजेचे वाटत होते. यासाठी भागोजीने सांगवी, ता. सिन्नर येथील संगमावरील बेटात राहात असलेल्या 'खंडेराव काळे' या मराठा समाजाच्या माणसाकडे मुक्कामाची जागा निवडली. मात्र मिठसागरे येथील एक नीतीभ्रष्ट ब्राह्मण भागोजीवर नजर ठेवून होता. त्याला भागोजीवर लावलेल्या इनामाची आशा लागली होती. भागोजी नाईक खंडेराव काळेकडे कायम येत असतो याची बातमी त्याला लागली. त्याने पाळत ठेवून भागोजी नाईक १० नोव्हेंबर १८५९ च्या रात्री खंडेरावच्या बेटात आल्याचे पाहाताच रातोरात ही बातमी पोलिसांना दिली. खबर पक्की असल्याचे नक्की होताच भागोजीच्या मागावर असलेल्या साऊटरने रातोरात बेटास वेढा दिला. याची भागोजीच्या फलटणीस अजिबात कल्पना नव्हती. सकाळी मार्गक्रमणासाठी बेटाबाहेर पडत असतानाच इंग्रज पोलिसांनी गोळीबार सुरू केला. पण या बिकट प्रसंगालाही भागोजीने धैर्याने तोंड दिले. बंदुकीच्या दोन्ही बाजूंनी फैरीवर फैरी झडू लागल्या. साऊटर भागोजीस शरण येण्यास सांगत होता. पण शरणागती हा शब्दच भागोजीला माहीत नव्हता. त्याला फक्त 'स्वातंत्र्य' हा शब्द माहीत होता. भागोजीला शेळीचे मरण नको होते. त्याला मरण पाहिजे होते वाघासारखे, वीरासारखे. यामुळे साऊटरच्या आव्हानाला भिक न घालता तो लढतच राहिला. या लढाईत भागोजीचा एक एक वीर धारातीर्थी पडत होता. हे कृत्य भागोजी आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहात असतानाच एका गोळीने त्याचाही बळी घेतला. भागोजी जमिनीवर पडताच त्याच्या टोळीतील स्वयंपाकासाठी असणाऱ्या आदिवासी बाईने त्याचे प्रेत तिथेच बेटात–खड्ड्यात लोटले. धुमश्चक्री थांबताच भागोजी मेल्याची पूर्ण खातरजमा होताच साऊटर आपल्या सैन्यासह विजयी

मुद्रेने निघून गेला. यानंतर भागोजीचे प्रेत मिठसागरे येथे आणण्यात आले. मिठसागरे येथेच भागोजीला समाधिस्त करण्यात आले. तो दिवस होता ११ नोव्हेंबर १८५९. यामुळे नांदुर शिंगोटे येथे भागोजी नाईकाच्या विजयाचे स्मारक आहे, तर मिठसागरे येथे त्याची समाधी आहे.

**वीर गुलब्या नाईक:**

गुलब्याचे पुर्ण नाव गुलाब देवसिंग नाईक असे आहे. गुलब्या नाईकचा जन्म १८८५ मध्ये झाला. आई–वडिलांचे छत्र बालपणीच हरपलेले. गुलब्याचे जन्मगाव वडनेर, ता. मालेगाव, जि. नाशिक. त्याच्या आईचे नाव सोन्याबाई. आई–वडिलांच्या मृत्युनंतर त्याचा सांभाळ त्याच्या काकाने केला. लहानपणापासूनच त्याला व्यायामाची सवय असल्याने व गायी, म्हशीचे मुबलक दूध मिळाल्याने भरभक्कम शरीर तयार झाले. गुलब्या वयात आला असताना एक प्रसंग घडला. वडनेर गावच्या बाजारात फेरफटका मारण्यासाठी जात असताना रस्त्याने 'पांडू माळी' नावाचा माणूस बैलगाडीतून ऊस विकायला घेऊन चालला होता. गुलब्याने त्याला ऊस मागितला. त्या पांडू माळ्याने 'ऊस काय तुझ्या बापाचा आहे?' असे म्हटल्याने गुलब्याला त्याचा राग आला. एका ऊसावरुन बाप काढला याचे त्याला वाईट वाटले. पांडू माळ्याला काही न बोलता तो गुपचूप घरी आला. रात्रीचीच काही भिल्ल समाजाची पोर संगती घेऊन पांडू माळ्याचा संपूर्ण ऊस रात्रीतच तोडून टाकला. पांडू माळ्याने पोलिसात तक्रार केली. गुलब्याला पकडण्यासाठी एक उपनिरीक्षक व दोन पोलिस आले. गुलब्या त्यांच्याबरोबर मुकाटपणे गेला. परंतु मालेगावला जाण्याऐवजी निम्म्या रस्त्यात काष्ठीजवळ त्या तिघांचीही चांगलीच पिटाई केली. उपनिरीक्षकाला बेड्या घालून त्यांची मोडून फेकून देऊन दोन पोलिसांना घरच्या शेतात काम करण्यासाठी घेऊन आला. गुलब्याच्या या कृत्यामुळे त्याचा काकासुद्धा त्याला घाबरायला लागला. त्याने गुलब्याला स्वत:चे घर बंद केले. काकाच्या रागावण्यावरुन गुलब्याने काकाचे घर सोडले. त्याने जंगलाचा आश्रय घेऊन वाटमारी सुरू केली. श्रीमंत धनाढ्य व्यक्तींना लुटणे व लुटलेले पैसे वस्तू गरीब गरजू लोकांना वाटणे, हा त्याचा दिनक्रम होता. महिलांना त्रास देणाऱ्यास गुलब्या धडा शिकवत असे. कुठल्याही स्त्रीस तो आपली बहीण मानत असे.

गुलब्या सापडत नसल्याने वैतागलेल्या ब्रिटिश पोलिसांनी खाकुर्डी येथे पोलिस ठाणे सुरू केले. त्यावेळी मोसम नदी पावसाळ्यात चार महिने दुथडी भरून वाहत असल्याने व नदीवर पुल नसल्याने तक्रार देण्यासाठी लोकांना पोलिस ठाण्यात जाता येत नसे. गुलब्याच्या कारवाया दिवसेंदिवस वाढत असल्याने १९११ मध्ये वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे सुरू केले. हातात कंदील घेऊन रात्रीचा गुलब्याचा शोध घेणाऱ्या कित्येक पोलिसांना त्याने रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन चांगलाच चोप दिला होता. गुलब्या सापडत नाही म्हणून मालेगाव, सटाणा–खाकुर्डी पोलिसांनी संयुक्तपणे मांगीतुंगीच्या डोंगरावर गुलब्याला पकडण्याची मोहिम काढली. पोलिसांचा एवढा मोठा ताफा आपल्या बाजुने येतो आहे, हे पाहून त्याने जवळच्या धोतरांचा उपयोग त्यानं एकाला एक बांधून दोर केला व पोलिसांच्या विरुद्ध बाजूने मोठ्या कड्यावरून खाली खोल दरीत उतरला. जंगलाची खडानखडा माहिती असल्याने तो क्षणात या जंगलातून त्या जंगलात पळून जात असे.

गुलब्याची महादेवावर सर्वात जास्त श्रद्धा होती. वडनेर येथील महादेवाला तो दर्शनासाठी येत असे. महाशिवरात्रीला हमखास यायचा. यामुळे एका शिवरात्रीला पोलिसांनी मध्यरात्री पासूनच गुलब्याला पकडण्यासाठी कडक बंदोबस्त ठेवला. गुलब्या हमखास येणार म्हणून वरिष्ठ अधिकारीही डोळ्यात तेल घालून मंदिराच्या आवारात फिरत होते. तरी गुलब्या न डगमगता वंजारी समाजाच्या वेशात आला. महादेवाचे दर्शन घेऊन सावकाश जात असताना रस्त्यावरच्या शेवटच्या पोलिसाला जवळ बोलवून म्हणाला, 'तुझ्या साहेबाला सांग 'तुझा बाप येऊन गेला म्हणाव.' त्याच्या या

वर्तणुकीमुळे संपूर्ण पोलीस यंत्रणाच हादरली. स्वतंत्र पोलीस तुकडी नेमून व वडनेर येथे पोलीस चौकी बांधूनही गुलब्या सापडत नव्हता व त्याच्या कारवाया कमीही होत नव्हत्या.

गुलब्याची पोलीसांना मारण्याची पद्धत वेगळी होती. पोलीसांना हाताने न मारता त्यांना तंगडीला धरून गरगर फिरवायचा व कापडासारखा आपटायचा. एकदा तर गुलब्याचा साथीदार अबळ्या एका चकमकीत पोलिसांची गोळी मांडीला लागून खाली पडला. पोलिसांनी त्या अबळ्याला पकडून नेले. गुलब्याचे अबळ्यावर भारी प्रेम. त्याला अबळ्या डोळ्यासमोर दिसू लागला. गुलब्याने अबळ्याला सोडवण्याचा निश्चय केला. फौजदाराचा ड्रेस घालून सटाणा पोलीस ठाण्यात गेला. तिथल्या फौजदाराला गुलब्याकडे पाहून वाटले, जिल्ह्यावरून डिपार्टमेंटचा माणूस आलाय. त्याने गुलब्याला अबळ्याच्या खोलीकडे नेले. फौजदाराला बाहेर ठेवून विचारपूस म्हणून आत गेला. जाताना दरवाजा मात्र उघडाच ठेवला. अबळ्याजवळ जाऊन म्हणाला 'मी गुलब्या तू उघड्या दरवाजातून पळ. मी तुला नेम चुकवून गोळ्या मारतो.' अबळ्या पळाला. गुलब्या गोळ्या चुकवून झाडावरच मारू लागला व पळत अबळ्यामागे पोलीस ठाण्यातून बाहेर आला व ओरडून म्हणाला, "फौजदारा, गुलब्या हाय मी. आता ये तुझ्या बापाला पकडायला."

गुलब्याच्या या कृत्यामुळे इंग्रज पोलिसांनी त्याला पकडून देणारास ५००० रुपये बक्षिस जाहीर केले. पण गुलब्या सापडला नाही. सरते शेवटी वृद्धत्वानेच मांगीतुंगीच्या डोंगरात त्याचे निधन झाले. त्यामुळे आदिवासी हळहळतात.

**वीर पी. जी. भांगरे:**

पी. जी. भांगरे हे अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील अलौकिक व्यक्तिमत्त्व. लहानपणापासून कम्युनिस्ट चळवळीशी संबंध आल्याने त्यांच्या कार्यात एक अमुलाग्र बदल झाला. तालुक्यातील महादेव कोळी या आदिवासी समाजाला संगती घेऊन स्वातंत्र्याच्या लढाईत उडी घेऊन ब्रिटिश सत्तेला हादरा दिला. यामुळेच त्यांना तालुक्याचे स्वातंत्र्य चळवळीचे पितामह म्हटले जाते. त्यांनी जंगलतोड सत्याग्रह, फोनचे खांब तोडणे, फोनच्या तारा तोडणे, तहसिलदार कचेरी जाळणे यासारखे जहाल कृत्य करून ब्रिटिश सत्तेला हादरा दिला. त्यामुळे त्यांना आदिवासी चळवळीत महत्वाचे स्थान होते.

**वीर दगडू पाटील गोडे:**

इंग्रज सत्तेच्या विरोधात लढण्याचे सर्वप्रथम कार्य आदिवासी वीरांनीच केले. या देशावर ज्या ज्या वेळी परकीय आक्रमणे झाली, त्या सर्वांना शह देणारा समाज या देशातला आदिवासीच होता. त्यांचे हे प्रत्येक लढे मातृभूमीच्या प्रेमातून व स्वत:च्या संरक्षणासाठीच होते. पण त्यांच्या या शूरपणाची दखल भारतीय इतिहासाने कधी घेतलीच नाही. द्रविडांनंतर आलेल्या वैदिकांना मात्र या देशावर आक्रमण करणाऱ्या प्रत्येक गटाशी मिळते जुळते घेतले. मुस्लीम आक्रमनाणालाही वैदिक ब्राह्मणांनी सुरुवातीला कोणताच प्रतिकार केला नाही. उलट या मुस्लिम आक्रमणांना या देशाची भौगोलिक माहिती दिली. तसे इतिहासात पुरावे मिळतात. आदिवासी समाजाने स्वत:च्या फायद्याचा विचार कधीच केला नाही. त्यांनी विचार केला तो आपल्या भूमीचा व देशाचा. देशभक्तीचे गुण त्यांच्यात पहिल्यापासूनच आहेत. कारण सर्वात जास्त वास्तव्य या भूमीवर आदिवासींचेच आहे.

इंग्रज सत्तेला शह देणारी व त्यांच्या विरोधात प्रथम आवाज उठवणारी आदिवासी समाजातील भिल्ल व रामोशी याच जातीतील माणसे अग्रेसर होती. क्रांतीची मशाल पेटवण्यासाठी प्रथम आदिवासींचेच हात पुढे सरसावले. भारतभूमी

आदिवासींची मूळ भूमी असल्याने अन्यायाची चीड त्यांच्याच मनात प्रथम निर्माण होणे साहजिकच होते. ज्यांनी देश लुटला व जातीच्या आणि वर्णव्यवस्थेच्या नावाखाली फोडला त्यांना कोणते आले प्रेम व देशभक्ती? ही रग व मनातील आग भडकण्यासाठी तिथे पाहिजे जातीचे असे वावगे ठरणार नाही.

आदिवासी समाजातील भिल्ल समाजाच्या वीरांनी १८१८ ते १८५८ पर्यंत स्वातंत्र्याची मशाल मोठ्या कष्टाने तेवत ठेवली. त्यांच्या या कार्याची लाज वाटून बाकीच्या समाजाचे वीर हळूहळू पुढे येऊ लागले. इंदूर ते नांदूर, बागलाण ते बऱ्हाणपूर, श्रीरामपूर ते सुलतानपूर या भागात इंग्रजसत्तेविरुद्ध भिल्ल समाजाने मोठ्या कष्टाने झुंज दिली. ११ एप्रिल १८५८ च्या अंबापाणीच्या लढाईत अटक झालेल्या ५७ भिल्ल बहादूरांनी ढोलाच्या ठोक्यावर बंदूकीच्या गोळ्या झेलून बलिदानाचा मान मिळवला. या लढाईत आदिवासी स्त्रियांनीपण इंग्रज सत्तेविरुद्ध मर्दानीपणाची झुंज दिली. भागलपूर, चिरकूल येथे १८५५ ते १८५७ या काळात आदिवासींनी अनेक निर्णायक लढे इंग्रज सत्तेविरुद्ध दिले.

तसेच ठक्करबाप्पा, नारायण सिंह उईके, दादासाहेब बिडकर, अनुताई वाघ, गोदावरी परुळेकर, होनाजी केंगले, महाराणी दुर्गावती, बाबुराव शेडमाके, अंबरसिंग महाराज, दाशरीबेन या संवाभावी कार्यकर्त्यांचा समावेश करता येईल, असे संशोधकाला वाटते.

**वीर दादासाहेब सौदाणे:**

दलित समाजाच्या उद्धारासाठी डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आदिवासींच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य हाती घेतले होते. भुकेमुळे, व्याकूळ होणारा आदिवासी समाज स्वाभिमानाने ताठ उभा राहिला पाहिजे, यासाठी त्यांनी आदिवासींमधील अस्मिता जागी करण्याचा कसून प्रयत्न केला. आदिवासींच्या हाताला काम व पोटाचा प्रश्न कायमचा सुटण्यासाठी हक्काची जमीन आदिवासींना मिळाली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते. हे ध्येय उराशी बाळगून त्यांनी लोकनेते दादासाहेब गायकवाड यांच्या मदतीने संपूर्ण महाराष्ट्रातून मुंबईत भूमिहीन शेतमजुरांचा भव्य मोर्चा काढला. हा मोर्चा जवळजवळ सहा लाखाचा होता. त्यांच्या या कार्याने संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला तर आदिवासींचा हा हक्काचा आवाज ऐकून शासन यंत्रणा जागी झाली. दादासाहेब सौदाणे यांचे काम नाशिक, नगर, धुळे, औरंगाबाद या जिल्ह्यातून चांगल्या प्रकारे होत होते.

**वीर खाजा नाईक:**

खान्देश भागातील खाजा नाईक याने इंग्रज सत्तेला कडवी झुंज देऊन जेरीस आणले होते. खाजा नाईकाचे नाव घेण्यासही माणसे घाबरत. याच खाजा नाईकाला नंतर त्याच्या सारखाच शूर लढवय्या, पराक्रमी निधड्या छातीचा आदिवासी वीर 'भिमा नाईक' येऊन मिळाला. या दोघांनी १५०० भिल्ल लोकांची फौज उभी केली. नोव्हेंबर १८५७ मध्ये कलेक्टर साहेबाचा मुक्काम खान्देशात ज्या गावात होता, त्याच गावाशेजारील दोन गावे रात्रीचे लुटून कलेक्टरलाच शह दिला. खाज्या नाईक व भिमा नाईक यांनी इंदोरहून मुंबईकडे इंग्रजांचा बैलगाडीतून चाललेला खजिना मोठ्या हिमतीने लुटला. तसेच मुंबईकडे सात गाड्यातून इंग्रज अफू नेत असताना लुटली. पोस्ट ऑफिस लुटणे, टेलिफोनच्या तारा तोडने, फोनचे खांब तोडणे हे तर त्यांचे कायमचेच इंग्रज सत्तेविरुद्धचे कारस्थान होते. एकदा तर त्यानं मुंबई आग्रा रोडवरची वाहतूक ठप्प करून इंग्रजांना आपल्या ताकदीचा व शौर्याचा आहेर दिला होता. हे त्याचे भारतमातच्या स्वातंत्र्यासाठी चालू होते. भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी तो तळहातवर शीर घेऊन इंग्रज सत्तेच्या विराधात अहोरात्र लढा देत होते.

## संदर्भग्रंथ सूची:

१) डॉ. तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्यः दिशा आणि दर्शन', स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, २०१२.

२) डॉ. तुमराम विनायक,' आदिवासी साहित्यः स्वरुप आणि समिक्षा', विजय प्रकाशन नागपूर, १९९४.

३) गायकवाड दीपक, 'आदिवासी चळवळ स्वरुप व दिशा', सुगावा प्रकाशन, पुणे.२००५

४) डॉ. गिरधारी भा.व्यं, 'आरसा: आदिवासी जीवन शैलीचा!', युगांतर प्रकाशन नाशिक, २००३.

५) डॉ. वाल्हेकर ज्ञानेश्वर, 'आदिवासी साहित्य–एक अभ्यास', औरंगाबाद.

६) डॉ. मुनघाटे प्रमोद, 'आदिवासी मराठी साहित्यः स्वरूप आणि समस्या', प्रतिभा प्रकाशन पुणे.